# ठाणे महानगरपालिका, ठाणे.
## प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष
## जाहिरात

ठाणे महानगरपालिका, ठाणे प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांच्या मार्फत ठाणे आपत्ती प्रतिसाद दला मध्ये खालील संवर्गातील पदे नेमणूकीच्या दिनांका पासून ११ महिन्याच्या कालावधी करिता पुर्णत: कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज करण्याची **दिनांक २०.०२.२०२०** पासून ते **दिनांक ०४.०३.२०२०** रोजी वेळ **सायंकाळी ०४.०० वा.** पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र | पदनाम | पद संख्या | जात व प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | अनुभव | मानधन रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डेप्युटी कमांन्डट | १ | - | १. कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय यांचे कडील ॲडव्हॅान्स डिप्लोमा इन फायर ईंजिनीअरिंग किंवा नॅशनल सिव्हील डिफेन्स कॉलेज यांच्या कडील पदविका प्राप्त | कोणत्याही महानगरपालिकेच्या अग्निशमन दला मधून उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांपैकी / अथवा पॅरामिलिटरी फोर्स येथून कमांन्डट अथवा डेप्युटी कमांन्डट निवृत्त झालेल्या उमेदवारांपैकी तसेच एन.डी.आर.एफ./ एस.डी.आर.एफ./ सी.डी.आर.एफ./ टी.डी.आर.एफ. या संस्थांमध्ये काम केलेल्या अधिकाऱ्यांपैकी अनुभव असल्यास प्राधान्य. | ५०,०००/- प्रति महा |
| २ | प्रशिक्षीत जवान | ५० | अ.जा-०६,<br>अ.ज-०४,<br>वि.जा(अ)-०२,<br>भ.ज (ब)-०१,<br>भ.ज(क)-०२,<br>भ.ज (ड)-०१,<br>वि.मा.प्र.-०१,<br>इ.मा.व.-०९,<br>एस.ई.बी.सी-०६,<br>इ.डब्लु.सी.-०५,<br>खुला -१३ | १. महाराष्ट्र राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथील अग्निशामक पाठ्यक्रम उत्तीर्ण.<br>२. सीटी डीसास्टर मॅनेजमेंट मुंबई यांच्या कडील फस्ट रिस्पॉन्डर या बाबत चे प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास प्राधान्य.<br>३. नागरी संरक्षण दल यांचे कडील पुरविमोचन प्रशिक्षण पुर्ण केले असल्यास प्राधान्य. | १. एन.डी.आर.एफ./ एस.डी.आर.एफ./ सी.डी.आर.एफ./ टी.डी.आर.एफ. या मध्ये काम केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी अनुभव असल्यास प्राधान्य.<br>२. जड वाहन चालवण्याचा परवाना व अनुभव असल्यास प्राधान्य<br>३. एन.डी.आर.एफ./ एस.डी.आर.एफ./ सी.डी.आर.एफ./ टी.डी.आर.एफ. या संस्थांमध्ये काम केलेल्या जवानांनाअनुभव असल्यास प्राधान्य.<br>४. रॅपलिंग व स्कुबा डायविंग चा अनुभव असल्यास प्राधान्य. | २०,०००/- प्रति महा |

**अटी व शर्ती :-**

**वयोमर्यादा:-** शासनाच्या नियमानुसार (शासकीय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांचे वयोमर्यादा शिथीलक्षम.)

१. पद क्र.०१ करीता वयोमर्यादा ६२ वर्षा पर्यंत.

२. शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२, दि. २५/०४/२०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्ष इतकी राहील.

३. ठाणे आपत्ती प्रतिसाद दल (TDRF) मध्ये सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या जवानांकरिता अटी व शर्ती शिथिल करण्यात येईल.

**टिप :-** जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदामध्ये वाढ / कमी करण्याचे अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत.

| | |
|---|---|
| १. | उमेदवारांने ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्यापदाचा अर्जा मध्ये स्पष्टपणे उल्लेख करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमूना www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| २. | उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव व जाती या अनुषंगाने असलेल्या दाखल्यांच्या स्वसाक्षांकीत प्रती (Self Attested Xerox Copies) अर्जा सोबत स्कॅन करून सादर करावे तसेच सदरच स्वसाक्षंकीत प्रती मुळ प्रमाणपत्रांसह मुलाखतीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.<br>फोटो आणि सही jpg format in passport size, शैक्षणिक पात्रता व अनुभवाचा दाखला pdf format मध्ये upload करणे. (३५०kb) |
| ३. | काही तांत्रिक अडचण आल्यास est.tmconline.in / helpdesk.aspx या संकेतस्थळावर upload करणे. |

| | |
|---|---|
| | नेमणुकी संदर्भात ठाणे महानगरपालिकेने घेतलेले सर्व निर्णय अंतिम रहातील. |
| ५. | ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे आपत्ती प्रतिसाद दल विभागातंर्गत सदरची पदे ठोक व कंत्राटी पध्दतीवर तात्पुरत्या स्वरूपात अस्तित्वात राहतील. |
| ६. | सदर उमेदवारांना महापालिका सेवेत कोणताही हक्क सांगता येणार नाही. सदरची जाहिरात ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या **( संकेतस्थळावर ई-सुविधा या सदराखाली भरती (Recruitment) येथे** संपुर्ण तपशीलासह प्रसिध्द करण्यात आली असून उमेदवाराने अर्ज सादर करण्यापूर्वी संकेत स्थळावरील जाहिरात काळजी पुर्वक वाचावी. |
| ७. | मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा कोणताही खर्च दिला जाणार नाही. |
| ८. | महानगरपालिकेकडे अर्ज सादर करताना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोण्त्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील. |
| ९. | प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोण्त्याही वेळेस कोण्त्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना आहेत. |
| १०. | नियुक्तीस पात्र झालेल्या उमेदवारास १००/- रूपयांच्या स्टॅम्पपेपरवर करारपत्र करावे लागेल. |
| ११. | जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुसूचित माध्यमांचा अवलंब केल्यास किंवा व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल. |
| १२ | मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. |

**मा. आयुक्त सो.**
**यांचे मान्यतेने**

**संदीप माळवी**
**उपआयुक्त (आपत्ती व्यवस्थापन)**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**